# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०३/२०२६ (गुरूवार )**

---

**नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैध अंमली पदार्थ गुन्हयामधील सक्रीय तसेच वर्चस्व निर्माण करून दहशत पसरविणाऱ्या २ आरोपींताविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वेय दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केले.**

**पोलीस स्टेशन खापा** :— पोलीस स्टेशन खापा येथे दाखल अप क्रं ६०४/२०२५ कलम ८(क),२०(ब),(ii),(ब)२९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान सदर गुन्हा टोळीने केल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्हयात मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात खापा पोलीसांनी अवैध अंमली पदार्थ गुन्हयामध्य तसेच ईतर गंभीर गुन्हयामध्ये सामील असलेल्या या टोळीविरूध्दच्या गुन्हयात कलम ३(१)(ii)३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अन्वये कलम वाढ करण्यात आली.

सदर टोळीचा टोळी प्रमुख आरोपी क्रं १) रामेश्वर उर्फ गोलु देवशंकर वर्मा, वय ३३ वर्षे, रा.येरला ता. कळमेश्वर जि.नागपुर हा असुन टोळी सदस्य आरोपी क्रं २) मनीष देवशंकर वर्मा, वय २५ वर्षे, रा. येरला ता. कळमेश्वर जि.नागपुर हा आहे. आरोपी हे सख्खे भाउ असुन त्यांचा गुन्हेगारी अभिलेख बघता, यातील टोळी प्रमुख रामेश्वर उर्फ गोलु देवशंकर वर्मा आणि २) मनीष देवशंकर वर्मा हे अैवधरित्या गांजा तस्करी करून विक्री करीत होते. तसेच स्वत:चे आर्थीक फायदया करीता आणि गुन्हेगारी क्षेत्रात वर्चस्व निर्माण करून सर्वसामान्य जनतेवर दहशत निर्माण करण्यासाठी ते टोळीने गुन्हे करीत होते. त्यांचेवर मागील १० वर्षाच्या काळामध्ये आतापर्यन्त पोलीस स्टेशन कळमेश्वर, खापा, खापरखेडा,

हुडकेश्वर येथे एकुण १५ गुन्हे नोंद असुन त्यात अवैध हत्यार, साधी दुखापत, गंभीर दुखापत, अवैध जुगार, अवैध अंमली पदार्थ तस्करी अणि विक्री असे गुन्हे नोंद आहे. हे गुन्हे आरोपींनी संघटितरीत्या केले असल्याचे निष्पन्न झाले.

**नागपुर ग्रामीण पोलीसांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास करून सबळ पुराव्यानिशी दोषारोप पत्र तयार करून दिनांक ०४/०३/२०२६ रोजी आरोपी क्रं १) रामेश्वर उर्फ गोलु देवशंकर वर्मा (टोळी प्रमुख) आणि आरोपी क्रं २) मनीष देवशंकर वर्मा (टोळी सदस्य) यांचे विरूध्द कलम ८(क), २०(ब), (ii), (ब) २९ एन.डि.पि.एस. कायदा आणि कलम ३(१)(ii)३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) अन्वये दोषारोप पत्र मा. जिल्हा व सत्र न्यायालय तथा विशेष न्यायालय (MCOCA), नागपुर येथे दाखल केले आहे.**



गोलु उर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा



**मनीष देवशंकर वर्मा**

## नरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत गुन्हेगार पतिराम गंगाजी कोकाटे याला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये पतिराम गंगाजी कोकाटे ,वय ६५ वर्षे, रा. गोंडेगाव ,नरखेड, जि. नागपुर याला नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले.**

सराईत गुन्हेगार नामे **पतिराम गंगाजी कोकाटे** याचेवर अवैध दारू बाबत **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसारातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच आरोपीच्या अवैध कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे गुन्हेगार **पतिराम गंगाजी कोकाटे ,वय ६५ वर्षे, रा. गोंडेगाव ,नरखेड**

**,जि नागपुर** याचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव नरखेड पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी यास **२ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्दपार गुन्हेगार पतिराम गंगाजी कोकाटे**

# अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ४५ हजार ५९० रूपयाचा मुद्देमाल जप्त, काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक ०४/०३/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहना**ने अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा नेहरू बाजार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान मोपेड पेप गाडी क्र. एम एच ४० व्ही ०९०८ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात विदेशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे मनोज श्रीपत पोडे, वय ५९ वर्ष, रा. मरामाय नगर, काटोल हा अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष वेगवगळया कंपनीची विदेशी दारू किंमती १५,५९०/— रूपये, मोपेड वाहन क्र. एम एच ४० व्ही ०९०८ किंमती ३०,०००/—रूपये असा एकुण किंमती ४५,५९०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री, वाहतुमक करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०९ गुन्हे नोंद

दिनांक ०४/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, वाहन, मोहाफुल दारू असा एकुण ५०,६९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** येथे महिला आरोपी यांचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे १) बादल रवी राऊत, वय २५ वर्ष, रा. वार्ड क्र. २, केळवद, ता. सावनेर २) राकेश गणेश उईके, वय ३२ वर्ष, रा. छत्रापुर खदान, ता. सावनेर, जि. नागपुर ३) राजेंद्र पतीराम भलावी, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. २, जटामखोरा ता. सावनेर, जि. नागपुर याचे वर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन** उमरेड येथे आरोपी नामे शिवाजी विश्वनाथ धनविजय, वय ६५ वर्ष, रा. कावरापेठ, उमरेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) मनोज श्रीपत पोडे, वय ५९ वर्ष, रा. मरामाय नगर, काटोल २) योगेश भिमराव चंद्रकिपुरे, वय ३४ वर्ष, रा. कोहळा, ता. काटोल यांचेवर प्रत्येकी एक असे ०२ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन नरखेड येथे आरोपी नामे सुरेश चिरकुट सराटे, वय ४० वर्षे, रा. येणीकोणी, तह. नरखेड याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे संजय नारायन गायकवाड, वय ५२ वर्ष, रा. अमरावती रोड, बाजारगाव याचे वर एक गुन्हा नोंद, अशा ०९ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ३५ लिटर मोहाफुल गावठी दारू, २) ३६०० मिली देशी दारू तसेच वाहन व साहित्य, १३८०० मिली विदेशी दारू असा एकुण ५०,६९०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने